# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः01.06.2024** **वारःशनिवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यातील मतदानाला सुरुवात
2. चार जूनला होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीसाठी राज्यात निवडणूक यंत्रणा सज्ज
3. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीनिमित्त राज्यभरातून अभिवादन
4. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरातील तळघरात सापडल्या जुन्या मूर्ती; पुरातत्व विभाग अभ्यास करणार आणि
5. महाराष्ट्राच्या लोकवाहिनीचा; जनसामन्यांच्या लालपरीचा आज 76 वा वर्धापन दिन

**<u>निवडणूक</u>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यातील मतदानाला आज सकाळी 7 वाजता सुरुवात झाली. या टप्प्यात पंजाब, चंडीगड, उत्तर प्रदेश, बिहार, ओडीशा, हिमाचल प्रदेश आणि झारखंडमधल्या मिळून एकंदर 57 लोकसभा मतदारसंघांमध्ये मतदान होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अनुराग ठाकुर, भाजपाचे ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद, काँग्रेसचे मनीष तिवारी, विक्रमादित्य सिंह, राष्ट्रीय जनता दलाच्या नेत्या मीसा भारती आणि तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांचं भवितव्य आज मतदान यंत्रात बंद होईल.

**<u>मतमोजणी तयारी</u>**

देशात सात टप्प्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीची मतमोजणी येत्या चार जूनला होणार आहे. यासाठी विविध ठिकाणी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. पुणे जिल्ह्यातल्या पुणे, बारामती, मावळ, शिरूर या चार मतदारसंघांच्या मतमोजणीची तयारी पूर्ण झाल्याचं जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. या चारही जागांची मतमोजणी दुपारी चार वाजेपर्यंत पूर्ण होईल अशी आशाही दिवसे यांनी व्यक्त केली.

गडचिरोली चिमूर लोकसभा मतदारसंघासाठी 97 टेबलांवर मतमोजणी होणार आहे. मोजणीच्या ठिकाणी त्रिस्तरीय सुरक्षा यंत्रणांची देखरेख असेल. उस्मानाबाद इथंही मतमोजणीसाठी यंत्रणा सज्ज झाली आहे. या ठिकाणी 1500 कर्मचारी 84 टेबलवर मतमोजणी करतील. तर 16 टेबलांवर टपाली मतांची मोजणी होईल असं जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंबासे यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. कल्याण लोकसभा मतदार संघातील यंत्रणा मतमोजणीसाठी सज्ज असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांनी दिली आहे.

**<u>निवाडा जनतेचा-मुंबई</u>**

मतमोजणीच्या दिवशी ताज्या निकालांच्या बातम्या देण्यासाठी आकाशवाणी मुंबईचा प्रादेशिक वृत्त विभाग सकाळी 9 वाजल्यापासून निवडणूक विशेष बातमीपत्र प्रसारित करणार आहे. तसंच निकालांचं सर्वंकष विश्लेषण करणारा चर्चात्मक कार्यक्रम निवाडा जनतेचा सकाळी 9 वाजून पाच मिनिटांपासून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सादर करण्यात येईल….

## अहिल्यादेवी होळकर जयंती

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाला कालपासून सुरुवात झाली. यानिमित्तानं राज्यभरात सर्वत्र अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. राज्यपाल रमेश बैस यांनी मुंबईत राजभवनातील अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं. अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या अहिल्यादेवींच्या जन्मगावी झालेल्या सोहोळ्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले उपस्थित होते. अहिल्यादेवी होळकर यांनी विकास आणि वारसा दोन्ही जपला होता; त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत राज्य सरकार काम करत असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. धनगर समाजासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरता कृती गटाची स्थापना केली असल्याचं त्यांनी सांगितलं. स्टॅचू ऑफ युनिटीच्या धर्तीवर नगर शहरात अहिल्यादेवी यांचा भव्य पुतळा उभारण्यासाठी सरकारने सहकार्य करावं अशी मागणी पालक मंत्री विखे पाटील यांनी यावेळी केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी अहिल्यादेवी होळकरांना समाज माध्यमांवर आदरांजली वाहिली. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी अहिल्यादेवींच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत अभिवादन केलं. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राच्या वतीनं अहिल्याबाईंवरील एका इंग्रजी पुस्तकाचं प्रकाशन पुण्यात करण्यात आलं. सोलापूरमध्ये काल जल्लोषात मिरवणुका काढण्यात आल्या. यावेळी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित देखावे सादर करून त्यांच्या कार्याचं स्मरण करण्यात आलं. नागपूरातही दुचाकी फेरी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

## पंढरपूर तळघर

पंढरपूर इथल्या श्री विठ्ठल रुक्मिणीच्या मंदिरात हनुमान दरवाजाजवळ सहा गुणिले सहा फूट उंचीचं तळघर आढळलं असून यामध्ये तीन फूट उंचीच्या दोन व्यंकटेश्वराच्या मूर्ती, पादुका आणि काही जुनी नाणी आढळून आली. पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी या वस्तू ताब्यात घेतल्या असून याविषयीचा अहवाल शासनाला पाठवण्यात येईल असं त्यांनी सांगितलं. या मूर्ती पंधराव्या किंवा सोळाव्या शतकातल्या असण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वहाने आणि वास्तू विशारद तेजस्विनी आफळे यांनी तळघरातून भग्नमूर्ती आणि पादुका बाहेर काढल्या. यावेळी मंदिर समितीचे सदस्य उपस्थित होते.

## एसटी वर्धापन दिन

गाव तिथे रस्ता आणि रस्ता तिथे एसटी, अशी ख्याती असलेल्या महाराष्ट्राच्या लोकवाहिनीचा, जनसामन्यांच्या लाडक्या लालपरीचा आज 76 वा वर्धापन दिन आहे. 1 जून 1948 ला पुणे-अहमदनगर मार्गावर एसटीची पहिली बस धावली. त्याची आठवण ठेवत दरवर्षी 1 जून हा दिवस एसटीचा वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. आजही राज्यातल्या प्रत्येक बसस्थानकावर हा दिवस उत्साहात साजरा होणार आहे. रांगोळी, फुला-पानांची तोरणं बांधून सर्व बसस्थानकं सजवण्यात येत आहेत. प्रवासी आणि कर्मचाऱ्यांना पेढे वाटून शुभेच्छाही दिल्या जाणार आहेत. राज्यातील सर्वसामान्य जनतेला सुरक्षित आणि किफायतशीर सेवा देण्याचा प्रयत्न एसटी प्रामाणिकपणे करत आहे. त्यासाठी 87 हजार कर्मचारी आणि अधिकारी रात्रंदिवस राबत आहेत. दररोज सरासरी 55 लाख प्रवासी यातून प्रवास करतात.

## काजवा महोत्सव-अहमदनगर

निसर्गाचं भरभरून वरदान लाभलेल्या अहमदनगर जिल्ह्यातल्या भंडारदरा परिसरात सध्या पर्यटकांची गर्दी दिसत आहे; ती इथले काजवे पाहण्यासाठी! अकोले तालुक्यात मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात या काजवा महोत्सवाला सुरुवात होते. ऐकुया या महोत्सवाबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**भंडारदरा अभयारण्यात काळोख्या रात्रीच्या वेळी लुकलुकणारे लाखो काजवे सध्या पर्यटकांना आकर्षित करत आहेत. हे मनोहारी दृश्य आपल्या डोळ्यात साठवून ठेवण्यासाठी पर्यटक रात्रभर इथे थांबतात आणि पहाटे आपल्या घराकडे मार्गस्थ होतात. या भागातील पांजरे, उडदावणे, मुरशेत, रतनवाडी, मुतखेल, पुरुषवाडी, कोलटेंभे, फोफसंडी या भागात असणाऱ्या बोहडा, हिरडा, जांभूळ, सादडा या झाडांवर हे काजव्यांचे पुंजके पहायला मिळतात. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सुरू होणारा हा महोत्सव साधारण जूनच्या मध्यापर्यंत चालतो. जसजसं पावसाचं आगमन सुरु होईल तसे हे काजवे नाहीसे होतात आणि पुन्हा दिसतात ते थेट पुढच्या वर्षात.... निसर्गाच्या या विलोभनीय आविष्कारामुळे इथल्या पर्यटनाला चालना मिळत असून त्यातून स्थानिक व्यावसायिकांना आणि आदिवासीना रोजगारही मिळत आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी मनोज सातपुते अहमदनगर.**

**कल्याणीनगर कोठडी**

पुण्यातील कल्याणीनगर कार अपघात प्रकरणी सुरेंद्र अगरवाल आणि विशाल अगरवाल यांना न्यायालयानं काल 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. काल त्यांच्या पोलिस कोठडीची मुदत संपल्यानं त्यांना न्यायालयात हजर करण्यात आलं होतं.

**पाचगणी आयएसओ**

पाचगणी नगरपरिषदेच्या घनकचरा प्रकिया प्रकल्पाला आयएसओ मानांकन प्रमाणपत्र मिळालं आहे. असं मानांकन मिळवणारी राज्यातली ही पहिलीच नगरपरिषद आहे. आरोग्य विभाग आणि स्वच्छ भारत पॉईंट इथल्या कचरा प्रक्रिया प्रकल्पामध्ये राबवलेल्या उत्कृष्ट कार्यप्रणालीसाठी हे प्रमाणपत्र देण्यात आलं आहे.

**कबड्डी**

राज्य कबड्डी असोसिएशन आणि पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सहकार्यानं 71 वी राज्य अजिंक्यपद निवड कबड्डी स्पर्धा पुण्यात होणार आहे. वरिष्ठ पुरुष गटाची स्पर्धा 13 ते 16 जुलै तर आणि महिला गटाची स्पर्धा 17 जुलै ते 20 जुलै या कालावधीत शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी इथं होणार आहे. यामध्ये 31 संघ सहभागी होणार असून या स्पर्धा मॅटवर होणार असल्याची माहिती राज्य संघटनेचे सरकार्यवाह बाबुराव चांदेरे यांनी दिली आहे. दरम्यान, कबड्डी महर्षी दिवंगत बुवा साळवी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केला जाणारा कबड्डी दिन 15 जुलैला आयोजित केला जाणार आहे.

**हवामान**

ब्रह्मपुरी इथं सर्वाधिक 46 पूर्णांक 9 अंश सेल्सियस तापमान काल नोंदवण्यात आला. विदर्भ आणि मराठवाड्यात पारा सतत 40 अंशांच्या वरच आहे. दक्षिण कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी उद्यापासून 4 तारखेपर्यंत वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.